डरहम मराठी मंडळ टोरंटो
Durham Marathi Mandal Toronto
Me Marathi. We Marathi. Together we make difference.




# मराठी ई-वृत्तपत्र

## जानेवारी ते मार्च २०२४



# प्रस्तावना

**!! डरहम मराठी मंडळ टोरोंटो तर्फे हार्दिक स्वागत !!**

लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
(सुरेश भट)

परदेशात राहणाऱ्या आपल्या सर्वांनाच तीव्र आठवण येते ती आपल्या मातृभाषेची. सकाळी उठल्यावर गरम गरम वाफाळता चहाचा कप आणि त्यासोबत ताजे वर्तमानपत्र म्हणजे खरे तर सुखाची परमावधी. इथे सातासमुद्रापार त्या आनंदाची थोडीतरी अनुभूती देण्यासाठी डरहम मराठी मंडळ घेऊन येत आहे मराठी त्रैमासिक 'डरहम ई-वृत्त'. डरहम भागातल्या मराठी भाषिकांच्या साहित्यिक कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, मराठी भाषकांनी चालविलेल्या उपक्रमांची व व्यवसायांची  ओळख करून देणे तसेच मंडळाने आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा आढावा व आगामी कार्यक्रमांचे आवाहन ही या नियतकालिकाची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.

२०२४ सालच्या गुढीपाडव्याच्या सुमुहूर्तावर या त्रैमासिकाची गुढी उभारत आहोत. या उपक्रमात आपण सर्व उत्साहाने सहभाग घ्याल याची आम्हास खात्री आहे. अंक वाचून तुमच्या प्रतिक्रिया नक्की कळवा.  प्रतिक्रियांनी लेखकांचा उत्साह तर वाढेलच तसेच तुमच्या बहुमूल्य सुचनांनी पुढील अंक वाचनीय व निर्दोष होतील.

माझ्या मराठी मातीचा
लावा ललाटास टिळा
हिच्या संगे जागतील
मायदेशातील शिळा
(कुसुमाग्रज)

संपादक मंडळ, डरहम मराठी ई-वृत्त
दिनांक: ९ एप्रिल २०२४
चैत्र शुक्ल प्रतिपदा, शके १९४६

## संचालक मंडळ

स्वप्नील भालेराव
अमोल कुलकर्णी
निलेश पाखरे
दीपक राजहंस

ICICI Bank
Canada




## कार्यकारी समिति

| | |
|---|---|
| स्वप्नील सुंदरकर- | अध्यक्ष |
| संतोष सकपाळ- | उपाध्यक्ष |
| विवेक कार्ले- | सचिव |
| फिरोज इनामदार – | सचिव |
| पराग पोटे - | खजिनदार |
| मंगेश नगरकर - | सह खजिनदार |
| दत्ता मानकरी - | सांस्कृतिक संघप्रमुख |
| स्वाती भोसले - | सांस्कृतिक संघप्रमुख |
| संजय खरात- | सांस्कृतिक संघप्रमुख |
| अश्विनी राजहंस - | सांस्कृतिक संघ प्रमुख |
| तृष्णा सकपाळ - | सांस्कृतिक संघप्रमुख |
| दिलीप पाटील - | सांस्कृतिक संघप्रमुख |
| विनय कटारिया - | सांस्कृतिक संघप्रमुख |
| श्रीकांत नाईक - | सांस्कृतिक संघप्रमुख |
| विक्रम देवळाणकर - | सोशल मेड आणि मार्केटिंग लीडर |
| देविका चांदोरकर - | सोशल मेड आणि मार्केटिंग लीडर |
| मंगेश पोखरकर - | सोशल मीडिया आणि मार्केटिंग लीडर |

## "शब्द"

(लेखक - तृष्णा सकपाळ)

शब्दान्ची माया ममता मोहविते मज

शब्द कय आहे तेच सांगते आज

शब्दच मारी शब्दच तारी शब्द उद्ध्हारी जगासही

जिवनाच्य छाया-प्रकशात शब्दच मज लपंडाव खेलवी

आयुश्याच्या रनांगणात शब्दची माझे शस्त्र होई

कठिन समय येता कोन कामास येई
पर धिर देन्या अन्तरी शब्दची मझा सखा होई

शब्द रचुनी केली कविता नाही मोठी साहित्यिक मी
शब्दच देइ दृष्टी मजला शब्द रुपी शृंगाराची

शब्दांची गुंफली माळ का आवडली तुम्हासती
शब्दरुपी सुमने तुम्ही घ्या त्यान्चा सुवासहि

कारन शब्दविना जगने नाही शब्दाविना मरनेही नाहि

शब्दच नसतिल तर जगण्याचा आनंद नाही अन
मरन्याचे दुख्हही नाही

शब्दन्च्या ओघात वाहुनी गाठेन मोठया सागरस मी

आहे आत्मआनंद याचाकी जिवन माझे शब्दरुपी

आहे आत्मआनंद याचाकी जिवन माझे शब्दरुपी .

************XXX**************


**Dattatrya Mankari (Datta)**
Financial Planning, Investment & Life Insurance Advisor

COSMOS FINANCIAL CENTER INC.

30 Topflight Dr. #8
Mississauga, ON L5S 0A8

Dir: +1 647 995 2508
Off: +1 905 795 0008
Fax: +1 905 784 1050

www.cosmosfinancial.ca datta@cosmosfinancial.ca

*Provide - Product of your choice from company you trust*

- Financial Planning
- Life Insurance (Term, UL & WL)
- Estate Planning
- Critical Illness & Disability Insurance
- Investment
- Super-Visa, Travel & Medical Insurance
- RRSP, TFSA, RESP (Saving + Govt Grant + Growth + Bonus)
- IRP - Insured Retirement Planning

www.cosmosfinancial.ca

*Promoting saving and investing for a better tomorrow*






# डरहम मराठी मंडळ टोरंटो

Quarterly Newspaper, January to March 2024, www.dmmt.org, marathimandaldurham@gmail.com, CANADA


## एसव्ही क्रिएशन्स तर्फे आयोजित "ताल उत्सव 2024" गायन स्पर्धे मध्ये कु. अनन्या विशाल गाताडे हिला द्वितीय पुरस्कार



एसव्ही क्रिएशन्सने 16 मार्च 2024 रोजी व्हिटबी कोर्टहाउस थिएटर टोरंटो कॅनडा येथे "ताल उत्सव 2024" या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमात संगीत आणि नृत्याची जुगलबंदी झाली. एस .व्ही. क्रिएशन प्रमाणेच पीकरिंग आयडॉल, पॅनोरोमा आयडॉल,ओपन माईक कॅनडा येथेही आपल्या सुमधुर गायनाचे प्रदर्शन अनन्याने केलेले आहे. सरगम मैफिल,षडज गंधार या मैफिलीत देखील आपल्या सुमधुर गीत गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले आहे.
युवा वर्गातील गायन स्पर्धेत कु. अनन्या विशाल गाताडे हिस द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. “हाय रामा ये क्या हुआ “या गीताचे मंत्रमुग्ध करणारे श्राव्यातीत गायन आपल्या सुमधुर आवाजात अनन्याने केले. या यशाचे सर्व श्रेय तिचे संगीत क्षेत्रातील गुरु ओंकार कडवे सर ज्यांच्याकडे गेली तीन वर्ष ती संगीताची साधना करत आहे. अनन्याची माता- भाग्यश्री गाताडे, पिता- विशाल गाताडे यांना दिले आहे. त्यांच्या बहुमोल मार्गदर्शनामुळे आज हे शक्य झाले. मराठी भाषेसोबतच अनन्याने संस्कृत तेलगू, इंग्लिश. हिंदी या भाषांमध्ये देखील अनेक गीते गायली आहेत.


अनन्याच्या या नेत्रदीपक यशाबद्दल सर्वच स्तरातून तिचे मनःपूर्वक कौतुक होत आहे. उत्तरोत्तर अनन्याची प्रगती अशीच होत प्रगतीचा हा आलेख चढता रहावा यासाठी अनन्याला मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा! अनन्या तुझ्या कीर्तीचा पारिजात माझ्या अंगणी फुलू दे, तुझ्या यशाचा चांदवा माझ्या नयनी खुलु दे! ह्या यशासाठी अनन्याला एसव्ही क्रिएशन्स तर्फे $५० रोख रक्कम प्राप्त झाली. अनन्याला तिच्या या यशाबद्दल या कविता रुपी शुभेच्छा

प्रत्येक शब्दाने तुझ्या मैफिलीचे गीत व्हावे,
सूर तुझ्या मैफिलीचे दूर दूर जावे,
तुजपुढे ठेंगणे व्हावे त्या उंच अंबराने,
साथ तुझी द्यावी यशाच्या प्रत्येक शिखराने,
बागडावे तू नभी उंच उडावे तू,
बनुन मोती सुंदरसा शिंपल्यात पडावे तू,
आपल्या भारतातील हे अनमोल हिरे असेच देश -विदेशात त्यांच्या प्रखर तेजाने चमकावेत हीच ईश्वरचरणी प्रार्थना

---












WWW.DMMT.ORG वर आमचे ई-वृत्तपत्र वाचा. तुमचा लेख MARATHIMANDALDURHAM@GMAIL.COM वर ईमेल करा

## सुखकर्ता

कथा लेखक - शांताराम थावरे

मला तर बाई काही वेळेला पुरुषांचं काहीच कळत नाही. आता ह्याचंच बघा ना. आपलं वय झालंय माणसाने किती फिरावं? पण नाही! अगदी भल्या पहाटे उठून बाहेर पडायचं ते तासा दोन तासांनी घरी यायचं. मॉर्निंग वॉक म्हणे कसला आलंय मॉर्निंग वॉक, ह्यांचा गमत्या स्वभाव. सगळे मित्र जमले की वेळेचं भान राहत नाही. शेखर आणि सुनबाई कामावर गेले की हे घरात पाऊल ठेवणार का तर म्हणे त्यांच्या घाई गर्दीत आपली लुडबुड नको चिन्याला आणि चिनीला घेऊन मीच सोसायटीच्या दाराशी जायचं,रिक्षा आली की रिक्षात बसवायचं आणि शाळेत पाठवायचं. आताशा जिनेही चढवत नाहीत.तरी बरं दुसरा मजलाच आहे.
असं होतं बघा मला तुम्हाला वेगळेच सांगायचं होतं पण वयामुळे नेमकं असं बोलताच येत नाही, उगाच फापट पसारा बरं जाऊ दे. तर ....सांगत काय होते... थांबा. दारावरची बेल वाजली वाटतं."आले आले" " या मला वाटलंच तुम्ही असाल" ह्यांना आत घेत मी म्हटलं.

" खयालो मे डुबी थी क्या राणीसरकार ?" घरात शिरताच हे म्हणाले
" अहो असं काय करताय रुक्मिणी आत काम करतेय. तिचं आवरलं की तुम्ही आंघोळ करून घ्या"
" येस जशी आपली आज्ञा. मस्तपैकी चहा करा, पेपर वाचतो आणि मग आवरतो."
तुम्ही म्हणाल एवढं काय कौतुक सांगताय नवऱ्याचं. खरं सांगू यांच्या गमत्या स्वभावाचा केव्हा केव्हा राग देखील येतो पण माणसाने असंच असावं असं ही वाटतं.

आता कालचीच गोष्ट.
रात्री आम्ही सर्वजण जेवायला बसलो. सर्व म्हणजे हे,मी, शेखर आणि सुनबाई. मुलांना जेवून केंव्हाच झोपवल होतं. "माझं एक पुस्तक पाहिलास का "? जेवता जेवता मी सुनबाई ला विचारलं
" कुठलं हो"
" आहे ते भजनी मंडळाच" "सापडत नाहीये का" सुनबाई म्हणाली
" हो ना सगळं शोधलं"
"हं बघते जेवण झालं की." सुनबाईने धीर दिला.

" शेखर मी काय म्हणतो आपण एक छोटसं कपाट घेऊ या का. आमच्या बेडरूममध्ये ठेवता येईल आणि त्यात हिच्या सगळ्या वस्तू ही राहतील."
हे अगदी माझ्या मनातले बोलले.
"बाबा पण छोटे कपाट म्हणजे..."
" फार महाग नाहीये अरे, काय होईल माझे, हिचे इतर सामान त्यात राहील. आता एकाच कपाटात सगळा गोंधळ होतोय" शेखर ला समजावत हे म्हणाले.
" स्वस्त महाग चा प्रश्न नाही बाबा पण ते बर दिसणार नाही" सुनबाई कडे पहात शेखर म्हणाला.
"बरं दिसणार नाही..? म्हणजे.." माझ्याप्रमाणे ह्यांचाही गोंधळ उडाला होता.
"म्हणजे आत्ताच आपण घराचं इंटीरियर केलं. एवढं महागडं आणि मग नवीन वस्तूंची त्यात भर पडली की समतोल बिघडतो म्हणून ते म्हणतायेत" सुनबाई शेखरची बाजू घेत पण आपल्या मनातलं बोलली.
"वर्षा अग घर सजावट महत्त्वाची की सोय महत्त्वाची. फार जागा नाही लागणार त्याला. आणि घराची सजावट बिघडणार नाही अशा रीतीने तूच कपाटाची निवड कर ".
सुनबाई च्या मनात नव्हतं कपाट घेण्याचं.
जेवण आणि विषय एवढ्यावरच संपला.

"अहो माझा पायजमा" बाथरूम मधून बाहेर येत हे म्हणाले
"हे काय सगळं बाहेर काढलं आहे. लवकर कोरडे व्हा, नाहीतर मग सर्दी आहेच.या वयात जरा निमित्त लागत आजारी पडायला"
"काल सुनबाई ने कपाटाचा विषय टाळला" मी एकदम मुद्द्यावर येत म्हणाले
"हां पण होईल ती राजी" "एकदम कपाटाचं काय तुमच्या मनात आलं" मी उत्सुकतेने विचारलं
"का? तुला नकोय. हसत हसत ते म्हणाले
"नाही नाही मला हवय" घाई घाईत मी उत्तर दिलं.
"पण मी काही बोलली नाही तसं तुम्हाला"
"विमल तू आत्तापर्यंत कधीच काही मागितलं नाहीस. कशाचाही हट्ट केला नाहीस" वर्तमानपत्र पुन्हा हातात घेत हे म्हणाले.

" मेलं एवढं वय झालं तरी संसाराची हौस काही जात नाही"
"आणि ती जाणार ही नाही". हसून हे म्हणाले.
"पण घराच्या चाव्या आता आपल्या हातात काही राहिल्या नाहीत" मी उसासा टाकत म्हणाले.
"काय करायच्या आपल्या हातात. दोन वेळा जेवण आणि पडायला जागा असली की पुरे".
"स्त्रीचे मन तुम्हाला नाही कळायचं.घरातला एखादा कोपरा, कप्पा अगदी ड्रॉवर सुद्धा चालेल तो आपल्यासाठी हवा, फक्त आपल्यासाठी आणि त्याची चावी आपल्याकडे असावी. काय वेगळच वाटतं. मला शब्दात नाही सांगता यायचं पण त्या एवढ्याशा ड्रॉवरची, कप्प्याची मालकी आपल्याकडे असते आणि आपली स्वतःची एखादी तरी जागा घरात आहे ही भावनाच किती सुखमय असते नाही?" मी कुठल्याशा तंद्रीमध्ये हरवून बोलत होते.
" एवढं वय झालं तरी हा मोह आहे?"
" मोह नाही हो! पण आपल्या दोघांचा स्वतंत्र कप्पा.दोघांच्या वस्तू. कोणाचाही हात लागणार नाही अशी जागा. खरंच ते मी कपाट असे व्यवस्थित ठेवीन. जुने फोटो , अल्बम आपण भटकंतीला गेलो तिथले बरच काही आहे हो. सागर गोटे, शिंपले. उतार वयातला संसार म्हणजे म्हणजे फक्त कपडे आणि दागिने नव्हे हो. आठवणींचा हा ठेवा कुठे ठेवू मी."
"तू जसं काही नवीन घर सजवत असल्यासारखी बोलतेयस."
" बघाना संसाराच्या सुरुवातीला एक खोली होती. आणि आयुष्याच्या उतरणीला पण आपण त्याच टप्प्यावर आलो. मधल्या काळातल्या एकेक करत घेतलेला वस्तू काळाच्या ओघात वाहून गेल्या. मोठं गमतीशीर आहे ना आयुष्याचा हे चक्र"
" विमल... बघू आपण घेऊ कपाट" माझ्या हातावर थोपटल्यासारखं करत हे म्हणाले.
"कुणाचं मन दुखावून आपल्याला काही नको. या वयात मन साधण्याचं काम नाही जमायचं. चांगल्या वातावरणात कपाटाच्या रूपाने उगाच मिठाचा खडा पडायला नको".
"काळजी करू नकोस खडीसाखरेचा खडा पडेल" हसत हसत हे म्हणाले.
विषयाचं गांभीर्य नाहीच जिकडे तिकडे गंमत करायची हा यांचा स्वभाव.
दिवस जातच होते. नेहमीसारखे.कपाटाचा विषय असाच कोपऱ्यात पडला. जाऊ दे झालं.मी ही लावून धरलं नाही. वयाच्या तिन्ही सांजा झाल्या की माणसाचं मन घाबरायला लागतं. कुठल्याही कारणाने दुरावा नको वाटतो. आपली माणसं आपल्याजवळ असावी असं वाटत राहतं.

श्रावण संपला आणि गणपती उत्सवाचे वेध लागले. सगळीकडे उत्साहाचे वातावरण पसरले. गणपतीच्या दर्शनासाठी मी आणि हे एक-दोन घरी गेलो. तळमजला नाहीतर पहिला मधला त्याच्या वर नाही. लिफ्ट असेल तर गोष्ट वेगळी.
पाच दिवसाचे गणपती आले आणि गेले सार्वजनिक गणपती पाहायला आम्ही पूर्वी जायचो. पूर्वी म्हणजे शेखर लहान असताना अगदी सुनितालाही कडेवर घेऊन आम्ही मंडळाचे गणपती पाहिले होते. काय ती भव्य सजावट ,ते कार्यक्रम ,बरं वाटायचं. यांना तर भारी हौस. अगदी रांगेत उभे राहून दर्शन घ्यायचे.

" आज संध्याकाळी आपल्याला मंडळाचे गणपती बघायला जायचं आहे" वाचून झालेला पेपर बाजूला ठेवीत हे म्हणाले.
"आजोबा मी पण येणार" चिन्या म्हणाला.
मी त्याला म्हटलं" बाबा रे एवढी गर्दी असते तिथे आणि आई ला विचार आणि मग ये"
" चिन्या दुपारी छान पैकी झोप काढ. मी तुझ्या आईची परवानगी काढतो". ह्यांनी त्याला नादवला होता.
"नक्की ना आजोबा" चिन्या हरखून म्हणाला.
" हो हो नक्की" हे म्हणाले "चिनी तू येणार का?".
"हो आजोबा मी पण येणाल" बोबडं बोल बोलले
" अहो तुम्ही त्यांना कशाला नादी लावताय बिचारी बाळं शेखर नाही म्हणाला की हिरमुसली होतील"
"मै हूं ना.बरोबर फिल्डिंग लावतो".
"आपल्याला झेपणार आहे का या वयात?" मुलांना घेऊन जाण्याबद्दल मी बोलत होते.
"काय झेपणार आहे का?" डोळे बारीक करत अगदी जवळ येतं ह्यांनी विचारलं.
मी त्यांना कोपरापासून नमस्कार केला.
पान नंबर 8
रात्री जेवणं लवकर झाली चिन्या जागाच होता. चिनी झोपी गेली. लहान बाळ ते. दुपारी येईन म्हणाली. संध्याकाळपर्यंत विसरून गेली.

" शेखर, जरा मंडळाचे गणपती बघून यायचं म्हणतोय"
"जाऊन या बाबा" शेखर म्हणाला.
"चिन्याला ही नेतोय"
"चिन्याला म्हणजे...." बायकोकडे पाहत शेखर पुटपुटायला लागला.
मेल्याला स्वतः निर्णय घेताच येत नाही. प्रत्येक गोष्ट बायकोकडे बघत बोलणार.
" अहो जाऊ द्यात ना बाबांबरोबर" सुनबाईने धर्म संकटातनं सोडवलं."आजचा शेवटचा दिवस आहे आणि आपल्याला तर जायला जमायचं नाही."
चिन्या खुष झाला. मलाही बरं वाटलं. सुनबाईचा मूड चांगला होता. आम्ही तिघेही बाहेर पडलो.
"काय चिन्या, म्हटलं होतं की नाही आई तुला पाठवेल म्हणून"
" तुम्हाला कसं माहित आजोबा?"
"आमची गंमत आहे ती" हे माझ्याकडे पाहत म्हणाले
"डोंबलाची गंमत" मी मनात म्हटलं.
जवळच्याच एका गणपतीचे दर्शन झाले आणि हे म्हणाले "चला चंदनवाडीत जाऊ या"
"चंदनवाडी? इतक्या लांब चालायला नाही जमायचं मला"
" अरे चालतंय कोण. रिक्षाने जायचं. नवसाचा गणपती आहे तो"
रिक्षाने चंदनवाडीत आलो.
बाई ग! काय नुसती जत्रा भरली होती. खेळणी काय, पिपाण्या काय, भेळपुरी शेवपुरी च्या गाड्या, मेरी गो राऊंड , पाळणे, चिन्याची मजा झाली. आवडणारी खेळणी घेतली. चिनीला मोठ्ठा फुगा घेतला.
दर्शनाला ही भली मोठी रांग.
"रांगेने दर्शन घेतलं तर मध्यरात्र उलटून जाईल. आपण बाहेरूनच नमस्कार करून निघू." मी ह्यांना म्हटलं.

चालत चालत आम्ही मंडपाजवळ पोहोचलो. तिथे तिकीट काढून वेगळ्या रांगेने दर्शन घेण्याची सोय होती. इथून दर्शन लवकर होणार होतं.
हयांनी दोन तिकीटे काढली.







indraprastha

INDIAN KITCHEN AND BAR

॥झुंजार॥

ZUNJAAR

DHOL TASHA PATHAK, TORONTO





" बर का चिन्या या तिकिटावर नंबर आहे. तिकिटाचा एक भाग त्यांच्याकडे एक आपल्याकडे .लकी नंबरला बक्षीसं पण आहेत."
आम्ही बोलत बोलत प्रवेशद्वाराशी आलो.
" चिन्या हे बघ आपला नंबर लागला तर यातील एखादं बक्षीस आपल्याला मिळेल" एका टेबलाकडे बोट दाखवत हे म्हणाले टेबलावर अनेक बक्षीसे ओळीने ठेवले होते.
बक्षीसां मध्ये कुकर होता, रेडिओ होता, घड्याळ होतं, प्रवासी बॅग होती, काचेची भांडी होती.
"आजोबा ती छोटी सायकल छान आहे ना. तिचा नंबर लागला पाहिजे"
चिन्या उत्साहाने सगळं पाहत होता.

आम्ही दर्शन घेतलं आणि रिक्षाने घरी परत आलो.
मंडळाच्या गणपतीचे विसर्जन झालं. गणपतीच्या दिवसातला उत्साह अजून मनात रेंगाळत होता. मिरवणूक निघून गेल्यावर रस्त्याच्या कडेला साचलेल्या गुलाला सारखा .
आज रविवार हे सकाळपासूनच घरात होते. शेखर सुनबाई त्यांची आठवड्याची काम उरकत होते.हे आपले दर दोन मिनिटांनी गॅलरीत जायचे. वाकून बघायचे, परत यायचे.
शेखर म्हणाला सुद्धा "बाबा कोणाची वाट बघताय?
काही नाही रे, आपले बंडू तात्या येणार होते. गॅलरीतून दिसले तर जाईन खाली."

एवढ्यात दारावरची बेल वाजली.
शेखर दार उघडायला जात होता.घाई घाईने हे म्हणाले "थांब शेखर मी बघतो."
दार उघडलं तर दारात शेजारचे नाना."काय पंत येताय कट्ट्यावर " नानांनी विचारलं.
"नाही आज घरीच थांबतो बंडू तात्या येणार आहेत."
"चालू द्या तुमचं. मी निघतो. काय? " असं म्हणून दारातूनच नाना गेले.
मला बाई कळेना हे आज घरी कसे काय?. आणि सारखं कोणाची तरी वाट पाहत असल्यासारखे. काहीतरी गडबड आहे.
दुपारचे जेवणं झाली. छानशी झोप झाली. बंडू तात्या काय आले नाहीत.
एवढ्यात दारावरची बेल वाजली. शेखरनेच दार उघडले.दारात एक इसम उभा लाल बनियन आणि लुंगी गुंडाळलेली.

"डिलिव्हरी हाय कपाटाची" असं म्हणून शेखरच्या हातात बिल दिले. काही समजेना.बिलावर नाव पत्ता तर बरोबर होता. एवढ्यात हे आतून लगबगीने आले आणि म्हणाले "हां हां आमचीच डिलिव्हरी आहे."
शेखर गोंधळला.सुनबाई बाहेर आली. तिलाही समजेना असे न ठरवता एकदम कपाट च घरी.
मला तर यातलं काही माहीत नव्हत.
सगळ्यांचे गोंधळलेले चेहरे पाहून हे हसत म्हणाले
"सांगतो सर्व सांगतो बसा इथे" "तुम्ही घेऊन या कपाट आत मध्ये." मजुरांकडे वळून हे म्हणाले.

"शेखर,वर्षा. आम्ही मागच्या आठवड्यात चंदनवाडीत गणेश दर्शनाला गेलो होतो."हे सांगू लागले.
" बरं मग ?"
"तिथे दर्शनाला रांग होती म्हणून दोन तिकीटे काढली आणि ह्या तिकिटांना बक्षीस होती."
हो आई. सायकल होती... घड्याळ होतं." चिन्या आठवून आठवून वस्तूंची नावे घेत होता.
मी ही आठवत होते. मला तर तेव्हा कुठे कपाट दिसले नाही.
पण मी गप्प राहिले.
"आजोबा, तुम्हाला बक्षीस लागलं?" टाळ्या वाजवत चिन्या म्हणाला.
"मग काय नवसाचा गणपती आहे तो. आपल्याला बक्षीस लागल आणि बक्षीसात कपाट मिळालं"
" बाबा तुम्ही बोलला नाहीत" लटक्या रागाने सुनबाई म्हणाली.
"चकित केलं की नाही सगळ्यांना" हे म्हणाले
"बाबा हे बिल तर दुकानाच दिसतय." हातातल्या बिलाकडे पहात शेखर म्हणाला.

"अरे हो,काय झालं,बक्षीस लागल्याचा फोन आला. मी आणि बंडू तात्या गेलो तर लाकडी कपाट होतं. 11 दिवसात 17 जणांनी हात लावला होता. दोन चार ठिकाणी ओरखडे उठले होते.पाॅलीश उडालं होतं. बंडू तात्या म्हणाले आम्हाला असं नको ,व्यवस्थित कपाट हवं. मंडळाचे लोक म्हणाले आम्ही जिथून कपाट आणले तिथे तुम्हाला दुसर कपाट मिळेल. तस आमच दुकानदाराशी ठरलेल आहे.

एव्हाना कपाटावरचा प्लास्टिक पेपर काढला होता.
सुबक कपाट पाहून सुनबाई खूष झाली
"काही म्हणा बाबा पण हे कपाट फार छान आहे. ही बॉर्डर बघा ना कशी छान दिसतेय". सुनबाई म्हणाली.
"हा एक दोन काम मी करून घेतली. लॉक लावून घेतले त्याचे बिल आहे हे" ह्यानी स्पष्ट केलं
माझा चेहरा आनंदाने फुलला होता मला मेलीला चेहऱ्यावर काही लपवता येत नाही.

शेखर आणि सुनबाई ने छोट कपाट आमच्या बेडरूम मध्ये आणलं
मी पूजा केली. ह्यांनी मला कपाटाच्या किल्ल्या दिल्या. आणि मी एकेक सामान लावायला सुरुवात केली माझ्या मनासारखं.

रात्री अंथरुणावर बसले होते. बाजूला हे पहूडले होते. डोळा लागला असावा. आजची संध्याकाळ आनंदात गेली. या आनंदात पायाचे दुखणे ही विसरायला झालं. डोळ्यावर झोप येत नव्हती. मन भरून आलं होतं. दाटलेल्या आभाळासारख. मी बराच वेळ कपाटाच्या किल्ल्यांशी चाळा करत होते. साखळीच्या एका टोकाला किल्ल्या होत्या आणि एका टोकाला गणपतीचा सुबक फोटो होता.
ह्यानींच ही साखळी चंदनवाडीत घेतली होती .पण तेव्हा त्याचा अर्थ समजला नव्हता आणि ते बक्षीसातलं कपाट ही दिसलं नव्हतं.

चावी हातात घेऊनच मी अंथरुणावर पाठ टेकली.
दिव्याच्या पिवळसर मंद प्रकाशात गणपतीचा फोटो चमकत होता.

पडल्या पडल्या गणपतीच्या फोटोकडे मी पाहत होते.
"गणराया तू इतरांसाठी सुखकर्ता असशील., पण माझ्यासाठी मात्र माझा राजाच आहे". असे म्हणून मी ह्यांच्या चेहऱ्यावरून हात फिरवला.

आपल्या मनातलं ह्यांनी खरं केलं होतं; माझ्या मनासारखं होण्यासाठी.


हे कुशीवर वळले, डोळे मिटूनच माझ्या कपाळावर थोपटायला सुरुवात केली. चिनीला थोपटाव तसं. माझ्या डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या. कडांमधून पाणी ओघळायला लागलं. श्रावणसरीसारखं. ह्यांच्या बोटांना ओलसर लागलं.तस चमकून ह्यांनी हात मागे घेतला. अंथरुणावर उठून बसले. मला ही उठण्याची खूण केली.
खुणेनेच "काय हे "म्हणून विचारलं.
 मला रहावेना. मी त्यांच्या कुशीत शिरले.आनंदाश्रूंना वाट मोकळी करून दिली.


थोपटायला सुरुवात केली. चिनीला थोपटाव तसं. माझ्या डोळ्यांच्या कडा ओल्या झाल्या. कडांमधून पाणी ओघळायला लागलं. श्रावणसरीसारखं. ह्यांच्या बोटांना ओलसर लागलं.तस चमकून ह्यांनी हात मागे घेतला. अंथरुणावर उठून बसले. मला ही उठण्याची खूण केली.
खुणेनेच "काय हे "म्हणून विचारलं.
 मला रहावेना. मी त्यांच्या कुशीत शिरले.आनंदाश्रूंना वाट मोकळी करून दिली.

आपल्या मनातलं ह्यांनी खरं केलं होतं; माझ्या मनासारखं होण्यासाठी.

- **शांताराम थावरे यांची रेखाचित्रे**







## एसव्ही क्रिएशन्स तर्फे आयोजित "ताल उत्सव 2024" गायन स्पर्धे मध्ये कु. श्राव्या नाईकला प्रथम पारितोषिक

एसव्ही क्रिएशन्सने 16 मार्च 2024 रोजी व्हिटबी कोर्टहाउस थिएटर येथे "ताल उत्सव 2024" या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या कार्यक्रमात संगीत आणि नृत्याची प्रतिस्पर्धा झाली.

युवा वर्गातील गायन प्रतिस्पर्धेत कु.श्राव्या श्रीकांत नाईक हिस प्रथम पुरस्कार मिळाला आहे. कु. श्राव्या नाईक ने अत्यंत सुंदरपणे "मेरे ढोलना" या गाण्याची प्रस्तुती केली. या प्रस्तुतीने उपस्थित दर्शकांना मंत्रमुग्ध केलं.

ह्या यशासाठी श्राव्या ला एसव्ही क्रिएशन्स तर्फे ट्रॉफी व $१०० चा नगद पुरस्कार मिळाला आहे.

प्रतिस्पर्धेत विजेतेपद मिळवणाऱ्या श्राव्या चे सर्वत्र कौतुक होत आहे. कु. श्राव्याने ह्या पुरस्काराचे श्रेय आई (सौ.आश्विनी नाईक) - वडील (श्री.श्रीकांत नाईक), लहान बहीण कु. काव्यश्री नाईक ,गायन संगीत शिक्षिका सौ.देवश्री पाठक , पियानो शिक्षक श्री.तपन सिंग व मित्रपरिवार यांना दिले आहे.

संगीत क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी कु.श्राव्या नाईक ला खुप खुप शुभेच्छा !

Youtube link : https://youtu.be/fbFBDyFwhC0?si=EuIAYvwA-






# दंडोबा

कथा लेखक - शंतनू बेडेकर

दंडोबाच्या मनोऱ्यावर वारा भयाण सुसाटला होता. अर्ध्यापेक्षा जास्ती सिगरेट वाऱ्यामध्येच अगरबत्ती होवुन चालली होती. पण आज आख्ख पाकीट बरोबर होतं. पूर्वी इथेच चार-पाच मित्र मिळुन थोड्याफार सिगरेटी आणायचो आणि शेअर करुन प्यायचो. कुणी तीनपेक्षा जास्ती झुरके घेवून सिगारेट पुढे नाही सरकवली की डोक्यात फाट्ट करुन टपली पडायची. आज खरं तर आख्खं पाकीट होतं पण शेअर मारायला कोणी नव्हतं.

ह्या दंडोबाच्या टेकडीवर गावी असताना कितीदा आलो ह्याची गणतीच नाही. गाडीवाटेनं आलं तर डांबरी सडकेपासून तासाभरात वर पोचायचो. मुरुमाच्या दगडातली काळीकुट्ट गुहा. आत कुणीतरी लावलेल्या पणतीचा मिणमिणता उजेड आणि त्या उजेडात फडफडणारी शंकराची पिंड. गुहेत आत शिरलं, की वटवाघळांच्या शिटेचा उग्र दर्प. आणि मग पिंडीला एक प्रदक्षिणा. गुहेची मागची भिंत आणि शंकराची पिंडी असलेलं गर्भगृह, यांच्यामध्ये एक फुटाची सांदरी होती. जणु भुयारच. काड्यापेटीची काडी पेटवुन हळुच ह्या सांदरीमध्ये शिरायचं. सतत पाणी झिरपून मऊसूत झालेला तो दगड, त्याला एक कुबट वास यायचा.

ह्या गुहेच्या छपरावर एक चांगलं मोठं पठार होतं. एक एकर-दोन एकर तरी असेल. आणि त्या पठारावर कधीकाळी कुणीतरी बांधलेला हा मनोरा. असेल तीस-चाळीस फूट उंचीचा. वर निमुळता होत गेलेला. वर चढायला अर्ध्या उंचीपर्यंत बाहेरुन पायऱ्या.

आणि मग टोकापर्यंत आतुन गोल-गोल पायऱ्या . अर्धा चढुन आल्यावर एक देवडी, पाच बाय पाच फुटाची. आणि मग अगदी वरपर्यंत चढुन आलं की हा मी आज बसलो होतो तो दोन फूट त्रिज्येचा कट्टा. मध्यभागी झेंडा उभारायला एक खळगा. माझी ह्या मनोऱ्याशीच जास्ती गट्टी होती.
दंडोबावर रात्री मुक्कामाला यायला सुरुवात केली, ती मी आणि सत्यानं. घरातुन ओवाळून टाकलेले आम्ही दोन वळू. गाव बोंबलत असताना आम्ही इथं येउन रात्री मुक्काम केला होता. रात्री तशी धाकधुक, भिती वाटतच होती. पण रात्र काढली. त्यानंतर मात्र सपाटाच लावला. गाडीवाटेनं, सिद्धेश्वराच्या दगडांच्या खाणींच्या बाजुनं, मागच्या जैन मंदीराच्या बाजुनं, हायवेला ट्रक पकडून आणि मग मधेच कुठेही उतरून सरळ मनोऱ्याच्या दिशेनं चढत, अश्या अनेक वाटांनी ही दंडोबाची टेकडी चढलो. संध्याकाळी गावाबाहेर येऊन हायवेला ट्रक पकडायचा. पाच-सात रुपयात १०-१२ मैलावर कुठेतरी उतरायचं. आणि मग चढायला सुरुवात करायची. हायवेला समांतर पसरलेली ही दंडोबाची बोडकी रांग माझ्या त्या चार वर्षांची जोडीदार होती.

.
.
.
.
.
.

पण दंडोबाचा पहिला कीडा डोक्यात सोडला तो भाऊंनी. भाऊ म्हणजे माझे आजोबा. शाळेत असताना मी आजी-भाउंबरोबर गावातल्या वाड्यातल्या घरात राहायचो. आई, बाबा आणि ताई बंगल्यावर राहायचे. पण बंगला गावाबाहेर असल्याने मला शाळेला यायला-जायला खूप लांब पडायचं. आणि म्हणुन मी गावात आजी-भाउंबरोबर.

रोज सकाळी पावणेपाच-पाच वाजता भाऊ मला उठवायचे आणि दात घासुन तालमीत पिटाळायचे. तिथं मल्लखांब करुन मी घरी परतेपर्यंत ते फिरुन परत आलेले असायचे. हमखास ओट्याशी उभं राहुन दुध गरम करत, जोर-जोरात हरीपाठ म्हणत असायचे. हरीमुखे म्हणा हरीमुखे म्हणा, पुण्याची गणना कोण करी! मला खरे तर गरम दुधाची चव अजिबात आवडायचे नाही. पण तरीही दुध पिउन, आवरुन मी सकाळच्या शाळेला पळायचो. एकदा मी तसाच दुध न पीता शाळेला गेलो तर, मधल्या सुट्टीत भाऊ एका पिवळ्या झाकणाच्या काचेच्या बरणीत दुध भरुन घेउन आले. मला अस्सा राग आलेला. पण ते सगळं दूध त्यांनी मला प्यायला लावलं.संध्याकाळी आजी-भाऊ रमी खेळायचे. काय वाट्टेल तशी रमी चालायची. आजीचा एक-एक सिक्वेन्स सहा-सात पानांचा असायचा.

पण भाऊ आपले काही न बोलता, मिश्किल हसत, रमी खेळत बसायचे. मग थोड्यावेळाने दूरदर्शनवर मराठी सिरिअल्स सुरू व्हायच्या. आमच्याकडं असलेला ब्लॅकनव्हाइट टीव्ही हा आत्यानं नवीन कलर टीव्ही घेतला म्हणुन देवून टाकलेला. त्यात मुंग्याच जास्ती दिसायच्या. इतक्या जास्त की कधी क्रिकेटची मॅच असली की बॉल पण दिसायचा नाही त्या मुंग्यांमध्ये. मग अधुन मधुन भाऊ मला शेजारच्या जोश्यांकडे स्कोअर बघायला पिटाळायचे. ह्या त्यांच्या टीव्ही, रमी कार्यक्रमांमध्ये मी कायम त्यांच्या मांडीवर लोळत असायचो. कधीमधी जर आत्या आलेली असेल, तर सारखं मला हाड-हाड करायची. म्हणायची, 'बघ कसा मांजरासारखा चिकटलेला असतो भाऊंना नेहेमी'.

पण मला त्यांच्या मांडीवर लोळायला आवडायचे. त्यांच्या चेहऱ्यावर एकदम मऊमऊ सुरकुत्या होत्या. आणि ते मला कधी कधी थापटायचे तेव्हा त्यांच्या हातालासुद्धा एक प्रेमळ वास यायचा. खरतरं, त्या वाड्यातल्या प्रत्येक वस्तुलाच एक वेगळा स्वतंत्र वास होता. वरच्या खोलीतल्या शहाबादी फरश्यांचा वास, जिन्याच्या लाकडी कुसं हातात घुसणार्यास दांडक्याचा वास, मोरीतल्या पितळी तांब्याचा वास, ओट्यावर असलेल्या खिडकीच्या लोखंडी जाळीला येणारा फोडणी आणि घट्ट धुळीचा एकत्र वास. अगदी बाहेरच्या लोखंडी कडीलासुद्धा एक जुना, बळकट वास होता.

सुट्टीच्या दिवशी भाऊ मला सकाळी सोबत घेउन फिरायला जायचे. पंढरपूर रोडला पोचलो की दूरवर दिसणारी डोंगररांग दाखवून म्हणायचे, 'तो बघ दंडोबाचा डोंगर. एकदा घेऊन जाईन मी तुला दंडोबावर.' मग मी भाऊंना दंडोबाबद्दल खूप काय काय विचारायचो. काय आहे तिथे वरती, कोण राहतं, वाघ आहे का, कसं जायचं तिथपर्यंत. आणि भाऊंकडे सगळ्या प्रश्णांची उत्तरं असायची.

हळुहळु करत दंडोबाच्या डोंगरावर कसं जायचं ह्याची योजना माझ्या डोक्यात पक्की झाली. पायथ्याच्या गावापर्यंत सायकलने जायचे आणि गावात सायकल लावुन, डोंगराच्या टोकाकडे चढायला सुरुवात करायची.




बरोबर खाण्याचा डबा, डब्यात पोळी आणि बटाट्याची सुकी भाजी, वॉटरबॅग, भाऊंचा मोठा टॉर्च, टोपी, मोठ्ठा रुमाल, दोरी आणि सायकलचा पंप. आता पंप सोडून बाकी सगळ्या गोष्टी होत्या. पण कोपऱ्या[वरच्या इर्षाद सायकलवाल्याकडे दोन पंप होते. त्यामुळे त्याने एक नक्की दिला असता.

.

.

.

.

चौथीची परीक्षा संपली होती. एके दिवशी सकाळी क्रिकेटची मॅच खेळून झाल्यावर, महश्या कुलकर्णी, बारका पश्या, काळा पश्या आणि सुन्या खैरमोडेला, माझा प्लॅन सांगितला. महश्या आणि बारका-काळा पश्या, ह्यांच्याकडं वडलांच्या सायकली होत्या. माझ्याकडे एक माझी स्वःताची बारकी सायकल होती. सुन्याला त्याच्या बाबानी सायकल तर दिली नसतीच, वर तंगडं मोडलं असतं. पण सुन्यानं घरातल्या दुकानच्या गल्ल्यातून अधुन मधुन थोडे थोडे पैसे हाणुन थोडेफार जमवले होते. त्या पैशातून दिवसभरासाठी भाड्याची सायकल घेता आली असती. आता काय-काय घ्यायचं आहे ते परत एकदा चौघांना सांगून दुसऱ्या दिवशी सकाळी आमच्या वाड्यासमोर सहा वाजता जमायचे ठरले.

मी दुपारी जेवताना भाऊंना सगळा प्लॅन सांगितला. अगदी इर्षादकडून पंप घेणार आहे हे पण सांगितले. पण ऐकून, भाऊ एकदम विचारात पडले. मला वाटलं हे ऐनवेळी नाही म्हणणार. तेव्हड्यात ते म्हणाले, 'पण तुला रस्ता कसा सापडणार?' मी म्हटलं, 'हात्तीच्या! त्यात काय!! सरळ वाड्यातनं बाहेर पडायचं, मालगांव वेशीतून पटवर्धनांच्या वाड्याच्या बाजुने पुढे जायचं. मग तासगांव वेशीचा मारुती आला की पंढरपूर रोड वरुन सरळ दंडोबाचा पायथा येइपर्यंत सायकल चालवायची. एकदा का पायथा आला की मग चढायला सुरुवात.'

'ते बरोबर आहे रे', भाऊ म्हणाले. 'पण डोंगरावर दाट जाळ्या आहेत. भरपूर पायवाटा आहेत. त्यातली एकच पायवाट वरपर्यंत जाते. जर का ती चुकली, तर मग माणुस गोल गोल फिरत राहतो तिथल्या तिथेच. आता वर जायची वाट माहिती असल्याशिवाय कसा जाणार तू?'







आता मात्र मी रडवेला झालो. इतके दिवस दंडोबाबद्दल सगळं ऐकत होतो. पण आज जायच्या आदल्या दिवशीच ह्या पायवाटा आणि चोरवाटा कुठुन उपटल्या. पण मग भाऊच म्हणाले, 'वरच्या गल्लीतल्या हरबाकडे, दंडोबाकडच्या एका गावातला दूधवाला येतो. तो आहे का ते बघुन येतो. आला असेल तर सांगतो त्याला, की उद्या ह्या पोरांना घेवून जा दंडोबावर. काय?' आणि चपला पायात सारुन भाऊ घराबाहेर पडले.

आता हरबाच्या घरात एक म्हैस होती खरी. पण त्याच्याकडं कुणी दुधवाला येतो हे काय मी कधी ऐकले नव्हते. पण भाऊ एव्हड्या दुपारचे गेले होते म्हणजे येत असेल बाबा कुणीतरी. थोड्यावेळाने भाऊ परतले. उन्हातुन आल्यामुळे त्यांचा चेहरा लालबुंद झाला होता.

'चार दिवस झाले, तो हरबाचा दुधवाला काही आला नाहीये रे. बहुतेक आजारी पडला असावा. एकदा का तो आला की मी लावुन देतो तुम्हाला त्याच्या बरोबर.'

मी भाऊंवर चिडलोच एकदम. एकतर एव्हडा सगळा प्लॅन केलेला. परत उद्या महश्या, दोन्ही पश्या आणि सुन्या येणार सकाळी, सगळ्या तयारीत. आणि माझा पचका. मी भयानक चिडून तालमीच्या ग्राउंडवर गेलो. दुपारच्या रटरटत्या उन्हात, ग्राउंडवर गाढवं सोडून, काळं कुत्रं नव्हतं. मी कवठाच्या झाडाखाली जाउन बसलो. खुप चिडल्यामुळे कानाच्या पाळ्या गरम झाल्या होत्या. वाटत होतं की आता धूर निघेल कानातून. मग मी खूप वेळ गुढघ्यात डोकं खुपसून रडत बसलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी महश्या, पश्या, सुन्या, कुणीच आले नाहीत.

.

.

.

सुट्टी संपली. शाळा सुरु झाली. ऑगस्टमध्ये भाऊ आणि त्यांच्या सकाळच्या फिरण्याच्या ग्रुप मधले, चिवटे अण्णा, बर्वे मास्तर, तात्या काका आणि मी, असे पाच जण आषाढी एकादशीच्या काही दिवस आधी पंढरपूरला गेलो. भाऊंनी मला वारी, ज्ञानदेव-तुकारामांच्या पालख्या, रिंगण, बाजीरावाची विहीर, विठोबाचं देउळ, असं सगळं दाखवलं. पण मुख्य म्हणजे, येताना आणि जाताना बसमधून दंडोबाचा मनोरा दाखवला. आणि म्हणाले, 'मी तुला एकदा दंडोबावर घेउन येइन नक्की.'



सहामाही परीक्षा झाली. दिवाळीची सुट्टी संपून परत शाळापण सुरू झाली. सकाळी थंडी असायची. प्रार्थना सुरु व्हायच्या आधी आम्ही काही मुलं थोडा वेळ कबड्डी खेळायचो. त्या दिवशी, सकाळी कबड्डी खेळताना, शिवणीवर चड्डी फाटली. एका हातानं तशीच चड्डी पकडून प्रार्थना आणि जनगणमन संपवलं. वर्गात पोचलो तर वर्गशिक्षक म्हणाले, 'दप्तर आवरुन बाहेर पळ. तुझी आई आली आहे तुला घरी घेउन जायला.'

मला कळेना की आईला कसे कळले की माझी चड्डी फाटली आहे ते. बाहेर गेटपाशी, आई रिक्षामध्ये बसली होती.

वाड्याच्या दारात रिक्षा आल्यावर, एका हाताने चड्डी पकडून मी आत धाव ठोकली. आज सुट्टी, त्यामुळे दिवसभर नुसतं खेळायचं. आत आलो आणि.

खालच्या खोलीत जमिनीवर भाऊ झोपलेले होते. त्यांच्या नाकात कापुस घातला होता. आणि गळ्यात हार. शेजारी आजी रडत होती.

.

.

.

.

शेवटची सिगरेट संपली. घश्याला कोरड पडली होती. सुर्य मावळुन अर्धा-एक तास उलटुन गेला होता. काळाकुट्ट अंधार पसरला होता. आजवर कितीतरी वेळा दंडोबावर आलो, कित्येक डोंगर दऱ्या पालथ्या घातल्या, जगभर हिंडलो...

पण भाऊंचा दंडोबा चढायचा राहिलाच.









**लाइफ सेव्हिंग सोसायटीचे जलतरण प्रमाणपत्र - कांस्य पदक.**

ची. सोहम राजहंस ( वय १५ वर्ष) याने लाइफ सेव्हिंग सोसायटी चे ब्राँझ मेडालियन आणि  इमरजेंसी फर्स्टऐड या श्रेणी चे पोहण्यासाठी चे सर्टिफिकेशन मिळवून उत्तुंग यशाचे शिखर गाठले. ची. सोहम ने दुरहॅम मधल्या ओशावा रिक्रिएशन सेंटर मधे ३ महिन्याचे प्रशिक्षण घेऊन लेखी तसेच प्रत्याशिक परिक्षेत पास होऊन २ मार्च रोजी हे सर्टिफिकेशन मिळवले.

दुरहॅम मराठी मंडळा कडून सोहम चे खूप अभिनंदन आणि पुढील वाटचाली साठी शुभेछा.

















## ICICI बँकिंग साक्षरता आणि सायबर जागरूकता कार्यशाळा

ICICI ने डरहम मराठी मंडळाच्या सहकार्याने 6 एप्रिल रोजी मुलांसाठी आणि पालकांसाठी बँकिंग साक्षरता आणि सायबर जागरूकता कार्यशाळा यशस्वीरित्या आयोजित केली. या कार्यशाळेत भारताचे महावाणिज्य दूतावास, टोरंटो पोलीस आणि आरबीसी विशेष पाहुणे म्हणून आमंत्रित होते. पालक आणि मुलांनी प्रचंड रस दाखवला आणि त्यांच्याशी संवादी सत्रात भाग घेतला. डरहम मराठी मंडळ आणि आयसीआयसीआय बँक सर्व सहभागींचे आभार. डरहम मराठी समुदायासाठी ही कार्यशाळा आयोजित केल्याबद्दल ICICI कडून राजन शारदा यांचे विशेष आभार.




## UPCOMING ICICI WEBINAR on Investment Opportunities and Financial solutions

**Register on:** https://dmmt.org/icici

**Date:** 2nd May, 2024

**Time:** 6.30 pm to 8 pm

**Address:** MS teams/Zoom Webinar

ICICI Bank Canada




Top 8 things to do when selling or buying a home.

1. Call me, I'll handle the other 7.

647-500-3079

Right At Home Realty Inc. Brokerage

RealtorShail@gmail.com
www.MyHomeInGTA.com



## मराठी वैवाहिक – Marathi Matrimonial

**डरहम मराठी मंडळाने मॅरीगोल्डच्या संयुक्त विद्यमाने मराठी विवाहसोहळा सुरू केला आहे, जिथे सांस्कृतिक परंपरा आधुनिक मॅचमेकिंगला भेटते!**

शहरी लँडस्केपमध्ये अस्सल आणि परिपूर्ण कनेक्शन तयार करणे हे आमचे उद्दिष्ट आहे. आम्ही शहरी जीवनातील अद्वितीय आव्हाने समजतो, वेगवान वेळापत्रकांपासून ते विविध संस्कृतींपर्यंत, आणि आम्ही ते अंतर भरून काढण्यासाठी, लोकांना अर्थपूर्ण मार्गाने एकत्र आणण्यासाठी येथे आहोत.

आजच सामील व्हा आणि तुमच्या आयुष्यातील घाईगडबडीत प्रेम, सहचर आणि अस्सल कनेक्शनच्या दिशेने प्रवास सुरू करा..

रविवार १२ मे २०२४ साठी तुमची कॅलेंडर चिन्हांकित करा

मराठी सिंगल्स मिक्सर... अधिक माहितीसाठी संपर्कात रहा!!!

https://dmmt.org/matrimonial

https://www.instagram.com/marrygold.ca/ वर आमचे अनुसरण करा





